# SPANDAN CAREER INSTITUTE

THE WAY OF SUCCESS…

**प्रश्नपुस्तिका क्र.**
**BOOKLET No.** **CS2021**

# C

**Total Que.: 80**
**Marks : 200**
**Time : 2 hrs.**

**Mob. No. 9923262977**
**Date : 12/12/2021**

**राज्यसेवा (पूर्व) सराव परिक्षा – 2021**
**विषय : – (C-SAT) [333]**

## सूचना

१. सदर प्रश्नपुस्तिकेत ८० अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरूवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका पर्यवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

२. आपला परीक्षा–क्रमांक हया चौकोनांत न विसरता **काळया बॉलपेनने** लिहावा.




३. वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

४. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. अशा प्रकारे प्रश्न सोडविणे **श्रेयस्कर** आहे; पण एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे. अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नाकडे परतणे सोईस्कर ठरेल.

५. उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

६. प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरापैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या **प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी एक तृतीयांश गुण वजा करण्यात येतील**.''

**खाली दिलेले परिच्छेद वाचा आणि प्रत्येक परिच्छेदावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे नमूद करा. या प्रश्नांची उत्तरे परिच्छेदावर आधारित असली पाहिजेत.**

**प्र. क्रमांक १ ते ५: खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या.**

एकोणिसाव्या शतकातील चळवळी, समस्या व त्या संबंधीचे एकंदर वाङ्मय 'ब्राम्हणी' आहे अशी टीका अनेक वेळा केली जाते. बहुजन समाज, मागासलेल्या जाती–जमाती यासंबंधी फारसे लिहिले गेलेले नाही. महात्मा फुले व त्यांची सत्यशोधक चळवळ ब्राम्हणेतर समाजाचा अभ्यास करण्यासाठी मार्गदर्शक ठरत असली, तरी एकूण ब्राम्हणेतरांविषयी लिखित माहिती, नोंदी फार कमी आहेत. ब्राम्हणेत्तर समाजात स्त्रिता आणि तळागाळाचे अस्पृश्य यांच्या व्यथा– वेदना, त्यांच्या आशा–आकांशा याविषयी तर माहितीच मिळत नाही. गेल्या काही वर्षात बंगालमध्ये उद्यास आलेल्या 'सबाल्टर्न स्टडीज' च्या माध्यमातून हया दबल्या गेलेल्या, दुर्लक्षित समाजघटकांचा शोध सुरू झाला आहे. मुंबईत स.ग. मालशे हया ख्यातकीर्त संशोधकांना ताराबाई शिंदे यांच्याविषयी अचानक माहिती मिळाली ती त्यांना पुस्तकरूपाने प्रसिद्ध केली आहे. ताराबाई शिंदे या मराठा मुंबई पुण्यापासून दूर असलेल्या बुलढाण्यासारख्या दूरच्या एका गावात वाढलेल्या त्यांच्या सुदैवाने शिक्षणाच्या सोयी त्यांना उपलब्ध झाल्यामुळे त्यांच्या जाणिवेच्या व ज्ञानाच्या कक्षा रूंदावल्या. फुल्यांच्या सत्यशोधक चळवळीचेही संस्कार त्यांच्यावर झालेले होते. ताराबाईचा काळ इ. स. १८४० ते १९१० असा मानला जातो. या काळात स्त्रीशिक्षण फारसे लोकप्रिय नव्हते. पण घरंदाज कुटुंबात झालेला जन्म व पुन्हा चार भावांमध्ये एकच बहीण होण्याचे सुदैव लाभल्यामुळे त्यांना कामचलाऊ स्वरूपाचे शिक्षण मिळाले होते. स्वभाव चौकस असल्यामुळे पुराणे व धार्मिक पुस्तकांबरोबर इतरही पुस्तके व वृत्तपत्रे त्यांनी वाचली, या वाचनामुळे त्यांना जीवनाकडे–विशेषत: सामाजिक परिस्थितीकडे पाहण्याची एक वेगळी दृष्टी प्राप्त झालेली होती. त्या काळात खानदानी कुळात जन्मलेल्या मराठा स्त्रिया समाजात फारशा मिसळत नसत. त्यांना मर्यादित स्वरूपाची पडदा पद्धती पाळावी लागत असे. ताराबाईंना दुर्देवाने मूलबाळ नव्हते. त्यांना वाचनाची हौस दांडगी होती. रमाबाई रानडे किंवा पंडिता रमाबाईंसारख्या त्या कोणत्याही चळवळीत नव्हत्या. कोणत्याही संघटनेशी त्यांचा फारसा संबंध आला नाही. भरपूर वेळ उपलब्ध असल्यामुळे व घरातील वातावरणामुळे धिटाईने व मोकळेपणाने त्या काही लिहू शकल्या. संसारातही त्यांचे मन रमले नव्हते. घरजावई असलेला त्यांचा नवरा फारसा कर्तबगार नव्हता. त्यामुळे लेखन–वाचन हाच त्यांच्या जीवनाचा आधार बनला असावा.

१. ताराबाई शिंदे यांचा विशेष स्वभाव गुण कोणता?

(१) फटकळ (२) तुडतुडया (३) चौकस (४) तुसडा

२. इ.स. १८४० ते १९१० या काळात कोणती गोष्ट लोकप्रिय नव्हती?

(१) प्रौढशिक्षण (२) क्रीडा शिक्षण (३) स्त्री शिक्षण (४) पुरूष शिक्षण

३. तत्कालीन समाजात कोणत्या खानदानी कुळातील स्त्रिया मिसळत नसत?

(१) ब्राम्हण (२) मराठा (३) वैश्य (४) गुजराती

४. सत्यशोधक चळवळ कोणी चालू केली?

(१) ताराबाई शिंदे (२) न्यायमूर्ती रानडे (३) महात्मा फुले (४) महर्षी धों. के. कर्वे

५. ताराबाई शिंदे यांच्याविषयी कोणास माहिती मिळाली?

(१) ह.म. घोडके (२) स.ग. मालशे (३) रमाबाई (४) रखमाबाई

**प्र. क्रमांक ६ ते ९: खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या.**

आजच्या युगात 'राष्ट्र' आणि 'राष्ट्र–राज्य' या संकल्पनांच्या बाबतीत फारच गोंधळ असल्याचे दिसून येते 'राष्ट्र–राज्य' हे जागतिक राजकीय संघटनांचे महत्वाचे घटक असून त्यांना परिभाषित करणे सोपे आहे. 'राष्ट–राज्य' ही संकल्पना सार्वभौम देश या संकल्पनेशी तंतोतंत जुळणारी असून यांना संयुक्त राष्ट्र सभेत प्रतिनिधित्वही आहे. इंग्रजीत त्यांना देश असे म्हटले जाते. खरं तर त्यांना 'राज्य' म्हणणे तसे सोपे आहे, परंतु दुर्दैवाने काही राष्ट्र–राज्यांत त्यांना त्यांच्या तुलनेत एक लहान घटक मानले जाते. 'राष्ट्र–राज्य' आणि सार्वभौम राज्य यांच्यात तुलना करून पाहण्याचा मोह हा स्वाभाविकच आहे. परंतु आधुनिक काळात सार्वभौमतेचे प्रवाही स्वरूप लक्षात घेता तसे करणे चकवणारे ठरू शकते. वास्तविक पाहता सर्वच राष्ट्र–राज्यांनी त्यांची सार्वभौमिकता काही अशी आंतरराष्ट्रीय संघटनांच्या स्वाधीन केलेली आहेच. संयुक्त राष्ट्र सभा याचे एक उदाहरण म्हणून दाखविता येईल. देशांच्या परस्पर व्यवहारात करार आणि संबंध यांची रचना गुंतागुंतीची आहे. याचे एक टोक म्हणजे यात काही मोठया राष्ट्रांना अधिकार मिळतात, तर दुसरे टोक म्हणजे अनेक लहान राष्ट्रे ही शक्तिशाली शेजाऱ्याच्या संरक्षणाखाली असल्यामुळे त्यांना खरोखर अनेक क्षेत्रांत स्वतंत्र निर्णय घेता येत नाही. बहुतांशी राष्ट्र–राज्ये ही स्वत:ला 'राष्ट्र' असे म्हणत असतात त्यामुळे आपणही राष्ट्र–राज्य ही व्यवस्था कायद्याच्या दृष्टीने मान्य आहे; तर राष्ट्र म्हणजे प्रजा किंवा लोक आधुनिक प्रजा किंवा लोक स्वत:ला राष्ट्र म्हणवितात आणि त्यांना स्वत:ला राष्ट्र–राज्याचा दर्जा प्राप्त करण्याची इच्छा आहे. राष्ट्र–राज्याच्या दर्जा हा राष्ट्राच्या वरचढ अशी त्याची व्याख्या करणे संकुचितपणाचे ठरले. सर्वच भाष्यकार हे म्हणणे स्वीकारतील की पूर्वीच्या सोवियत संघातील बहुसंख्य लोक म्हणजे जॉर्जियन्स, लिथुएनिअन्स, आणि युक्रेएनिअन्स, आणि युक्रकेनिअन्स ही संघराज्ये स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी राष्ट्रेच होती. त्याच प्रमाणे स्कॉटलँड सारख्या स्पष्टपणे परिभाषित केलेल्या प्रदेशाला देखील राष्ट्र–राज्य म्हणायला हवे. थोडं वेगळया रियपद्धतीने सांगायचे झाले तर स्वायत्तता किंवा स्वातंत्र्याची महत्त्वकांक्षा ही पुरेशी आहे. राष्ट्र–राज्य या आधुनिक संकल्पनेशी वरवचे साधर्म्य असले तरी राज्यकारभाराच्या काही पद्धती जुन्याच आहेत. काही शतकांपूर्वीच्या काही भागांचा विचार केला तर, उदाहरणार्थ : चायना, भारत आणि मेडिटेरेनियन्स हया फार प्राचीन पण मुळात मुलूख असलेल्या भागांवर पांढरपेशा लोकांचे नियंत्रण होते. या सुरूवातीच्या राज्यकारभाराच्या पद्धतींचा विकास होऊन किंवा हया ऐवजी राष्ट्र–राज्य हे अस्तित्वात आले. ही प्रक्रिया संथगतीने झाली त्यामुळे जुन्या पद्धतीचे अवशेष आधुनिक काळातही अस्तित्वात होते. ऑस्ट्रो–हंगेरियन, रशियन आणि तुर्कस्तान साम्राज्य जे १९१७–१९१८ पर्यंत अस्तित्वात

होते आणि तिथे घराणाशाहीचे साम्राज्य होते. परंतु तेथील प्रजेच्या मनात राष्ट्रीय अस्मितेची जराही जाणीव नव्हती. उलट रशिया जिथे खऱ्या अर्थाने १९९१ पर्यंत साम्राज्यवादी परंपरा होती तिथे मात्र अनेक राष्ट्रे एकत्रपणे अस्तित्वात होती. आजही अशी अनेक उदाहरणे देता येतील जिथे राष्ट्र–राज्ये आणि राष्ट्र ही एकमेकांशी सहजपणे न जुळणारी आहेत. राष्ट्र–राज्यातील शासक जरी स्वत:च्या राज्यकारभाराला राष्ट्र म्हणून प्रचार–प्रसार करीत असते तरी अनेक राज्यातील लोक याला राष्ट्रीय अस्मिता म्हणून स्वीकारणार नाहीत. ब्रिटन मधील अनेक स्कॉट आणि वेल्स लोक स्वत:ला ब्रिटिश नेशन समजण्यापेक्षा स्कॉट किंवा वेल्स मानतात. फार तर स्कॉटिश–ब्रिटिश किंवा वेल्स–ब्रिटिश. अरब राष्ट्रांमध्ये अनेकजण स्वत:ला त्या त्या राष्ट्राचे नागरिक समजण्याऐवजी स्वत:ला अरब राष्ट्राचा भाग मानतात. थेट इराक ते मोरक्को आणि दक्षिणी यमन पर्यंत.

६. 'राष्ट्र–राज्य' संकल्पनेविषयी पुढील विधाने अभ्यासा.

अ) ही संकल्पना सार्वभौम देश या संकल्पनेशी तंतोतंत जुळते.

ब) 'राष्ट्र–राज्यांना' राज्य असे संबोधायला हवे.

पर्याय

१) अ बरोबर; ब चूक २) अ चूक ब बरोबर ३) दोन्ही चूक ४) दोन्ही बरोबर

---

७. 'राष्ट्र–राज्य' आणि सार्वभौम राज्य' यांच्यात तुलना करणे चकवणारे ठरू शकते, कारण ....

अ) आधुनिक काळातील सार्वभौमतेचे प्रवाही स्वरूप

ब) राष्ट्र–राज्यांनी काही अंशी संयुक्त राष्ट्र सभेसारख्या संघटनांकडे स्वाधीन केलेली त्यांची सार्वभौमिकता.

पर्याय

१) फक्त अ २) फक्त ब ३) अ व ब दोन्ही ४) दोन्हीही नाही

---

८. 'राष्ट्र–राज्य' आणि राष्ट्र हे एकच आहे, असे का म्हणू नये ?

१) राष्ट्र–राज्य हे कायद्याच्या दृष्टीने मान्य आहे. २) राष्ट्र म्हणजे प्रजा किंवा लोक

३) १ व २ दोन्ही ४) वरीलपैकी एकही नाही.

---

९. पुढील विधाने अभ्यासा.

अ) ब्रिटन मधील अनेक स्कॉट आणि वेल्स लोक स्वत:ला ब्रिटिश समजण्यापेक्षा स्कॉट किंवा वेल्स मानतात.

ब) राष्ट्र–राज्यातील शासक जरी राष्ट्र म्हणून प्रचार करीत असले तरी अनेक राज्यातील लोक याला 'राष्ट्रीय अस्मिता म्हणून स्वीकारणार नाहीत'

पर्याय

१) अ व ब योग्य, ब 'अ' ची कारणमिमांसा देत नाही २) अ व ब योग्य, ब 'अ' ची कारणमिमांसा देते.

३) फक्त अ योग्य ४) फक्त ब योग्य

---

**प्र. क्रमांक १० ते १४ : खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या.**

वर्णपट म्हणजे प्रकाशाचे वेगवेगळया रंगांत, अचूकपणे सांगायचे तर वेगवेगळया तरंगलाबींत केलेले अपस्करण (डिस्पर्शन) वर्णपटांच्या अभ्यासाची सुरूवात सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात झाली. सूर्यप्रकाश हा सप्तरंगाचा बनलेला असल्याचे आयझॅक न्यूटनने, सूर्यकिरण लोलकातून पाठवून सिद्ध केले. यासाठी न्यूटनने १६६६ साली केलेल्या प्रयोगाची मांडणी – म्हणजे प्रकाशझोत निर्माण करणारे छिद्र, प्रकाशकिरणांचे अपस्करण करणारा लोलक आणि वर्णपट पाहण्यासाठी वापरलेला पडदा हाच जगातील पहिला वर्णपटमापक होता.

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी इंग्लिश संशोधक विल्यम वोलास्टन याने वर्णपट अधिक स्पष्ट दिसण्यासाठी छोटया गोलाकार छिद्राऐवजी रेखाछिद्राच्या (स्लीट) वापर केला. त्यानंतर जर्मनीच्या फ्रउनहॉफरने वर्णपटमापकात लोलकाऐवजी विवर्तन जाल (डायफ्रॅक्शन ग्रेटिंग) वापरले. विवर्तन जाल म्हणजे अगदी बारीक समांतर अशा हजारो अपारदर्शक रेशा काढलेली काच असते. या काचेतील पारदर्शक भागातून जेव्हा प्रकाशकिरण पार होतात, तेव्हा त्याचा एकत्रित परिणाम लोलकाप्रमाणेच प्रकाशकिरण तरंगलांबीनुसार वेगळे करण्यात होतो. प्रकाशातले रंग वेगळे करण्यात विवर्तन जाल हे लोलकापेक्षा अधिक परिणामकारक ठरते. या सुधारणा करणाऱ्या वोलास्टनने प्रथम आणि त्यानंतर फ्राउनहॉफरने सूर्याच्या वर्णपटात दिसणाऱ्या काळया रेषांची नोंद घेतली. फ्राउनहॉफरने केलेल्या या रेषांच्या पद्धतशीर अभ्यासामुळे, या रेषा कालांतराने फ्राउनहॉफररेषा म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या.

जळत्या ज्योतीत जर क्षार घातले, तर त्या ज्योतीला त्या क्षारांनुसार वेगवेगळे रंग प्राप्त होतात. १८२२ साली इंग्लिश संशोधन जॉन हर्शेल याने अशा विविध रंगांच्या ज्योतीचे वर्णपट अभ्यासले आणि विशिष्ट क्षार हे विशिष्ट रंगाचे प्रकाशकिरण उत्सर्जित करत असल्याचे दाखवून दिले. हर्शलच्या या शोधाला अनुसरून, १८५९ साली जर्मनीच्या गुस्ताव किर्शॉफने फ्राउनहॉफरच्या रेषांचे स्पष्टीकरण दिले.किर्शॉफच्या मते, एखादा पदार्थ ज्या तरंगलांबीचे प्रकाशकिरण उत्सर्जितत करतो, तो पदार्थ त्याच तरंगलांबीचे प्रकाशकिरण शोषूनही घेऊ शकतो.

सूर्याच्या बाहयभागातील कमी तापमान असणाऱ्या वायूंनी सूर्याच्या अंतर्भागाकडून येणारे विशिष्ट प्रकाशकिरण शोषल्यामुळे या फ्राउनहॉफर रेषा निर्माण होतात. वर्णपटातील उत्सर्जन रेषांप्रमाणे, या 'शोषण रेषा' चे स्वरूपही मूलद्रव्यांनुसार वेगवेगळे असते. वर्णपट हा मूलद्रव्यांशी निगडित असल्याने, अल्पावधीतच वर्णपटशास्त्र हे रासायनिक विश्लेषणाचे महत्वाचे साधन ठरले. नव्या मूलद्रव्यांचा शोध लावण्यातही वर्णपटशास्त्राने कळीची भूमिका बजावली.

१०. खालील विधाने तपासा

अ) जगातील पहिला वर्णपटमापक हा सतराव्या शतकाच्या मध्यांतर अस्तित्वात आला.

ब) जगातील पहिला वर्णपटमापक न्यूटनच्या प्रयोगाचे फलित होते.

पर्याय

१) ब योग्य, अ अयोग्य
२) अ योग्य, ब अयोग्य
३) अ आणि ब अयोग्य
४) अ आणि ब योग्य

---

११. जळत्या ज्योतीत जर क्षार घातले तर त्या ज्योतीला वेगवेगळे रंग प्राप्त होतात कारण.

१) क्षारानुसार ज्योत ही कमीजास्त होत राहते.
२) ज्योतींचे वर्णपट हे क्षारानुसार बदलत असतात.
३) विशिष्ट क्षार हे विशिष्ट रंगाचे उत्सर्जन करतात.
४) क्षार हे वेगळे असल्यानेच वेगळा रंग नेहमी प्राप्त होतो.

---

१२. फ्राउनहॉफरला कशाचे श्रेय दिले जाते?

१) वर्णपटमापकात लोलकाऐवजी विवर्तन जाल शोधासाठी
२) हजारो अपारदर्शक रेषा काढलेली काच वापरासाठी
३) सूर्याच्या वर्णपटात दिसणाऱ्या काळया रेषांची नोंद घेण्यासाठी
४) 'फाउनहॉफर रेषा' शोध अयशस्वी करण्यासाठी

---

१३. एखादा पदार्थ ज्या तरंगलांबीचे प्रकाश किरण शोषून येतो तो पदार्थ

१) त्याच तरंगलांबीचे प्रकाश किरण परावर्तित करतो.
२) त्याच तरंगलांबीचे प्रकाश किरण उत्सर्जित करतो.
३) शोषलेले किरण साठवून ठेवतो.
४) तरंगलांबीनुसार परावर्तन आणि उत्सर्जन घडवून आणतो.

---

१४. 'फ्राउनहॉपर रेषांबाबत' विधाने विचारात घ्या.

अ) विशिष्ट प्रकाश किरण शोषल्यामुळे या रेषा तयार होतात.

ब) या रेषा काळया रंगाच्या असतात.

क) किर्‌शॉफने या रेषांबाबत आपले मत मांडले.

ड) प्रकाशकिरण या रेषा निर्मितीत महत्वाचे असतात.

वरीलपैकी अयोग्य नसणारी विधाने निवडा

१) ब सोडून सर्व
२) ड सोडून सर्व
३) अ सोडून सर्व
४) वरीलपैकी सर्वच

---

**प्र. क्रमांक १५ ते १९ : खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या.**

उदारमतवाद हे एक कालबाहय मूल्य आहे. 'या मूल्याचे जीवितकर्तव्य संपलेले असल्याने त्यास आता गाडूनच टाकण्याची गरज आहे. युरोप, अमेरिका आदी लोकशाही देशांत अलीकडे निर्माण झालेले तणाव हे या मूल्याच्या आग्रहामुळे झालेले आहे.' या उदारमतवाद मूल्याने देशोदेशींच्या प्रचलित संस्कृतीवर अतिक्रमण केले असून त्यामुळे अनेक देशांक सांस्कृतिक संघर्ष निर्माण होताना दिसतात; जर्मनी हे त्याचे उदाहरण, पश्चिम आशियातील स्थलांतरितांना आश्रयदेणे ही जर्मनीच्या चॅन्सेलर अँगेला मर्केल यांची अत्यंत गंभीर चूक. 'अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे अत्यंत प्रतिभावान गृहस्थ आहेत, समलैंगिककतेस आपला काही आक्षेप नाही, फक्त या पद्धतीने जगणाऱ्यांनी पारंपरिक मूल्ये पाळणाऱ्यांचाही आदर करावा, या नव्या उदारमतवाद वगरेंच्या काळातही पारंपरिक मूल्ये, कुटुंबव्यवस्था यांस महत्व द्यायला हवे. कारण ही मूल्ये ही अधिक स्थिर आहेत आणि असेही उदारमतवाद हे मूल्य आता नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. हे या मुलाखतीत पुतिन यांनी मांडलेले दखलपात्र मुद्दे. रशियाचे परराष्ट्र धोरण, रशिया चीन संबंध आदी अनेक विषयांवर पुतिन यांनी मुलाखतीत भाष्य केले आहे. ते ठीक. पण आवर्जून उल्लेख आणि विचार करायला हवा तो पुतिन यांच्या उदारमतवाद आणि तदानुषंगिक मुद्द्यांचा.

स्वातंत्र्य, समता, बंधुता ही फ्रेंच क्रांतींची मानवतेस देणगी. त्यानंतर अमेरिकेत मानवतेचा लढा उभा राहिला आणि अब्राहम लिंकन यांच्या नतृत्वाखाली गुलामगिरी संपुष्टात आली. या तुलनेत साम्यवादाची विचारधारा आणि तिच्या आधारे झालेली रशियन राज्यक्रांती अलीकडची विसाव्या शलकाच्या सुरवातीला, १९१७ साली लेनिन यांच्या लढयामुळे रशियातील झारशाही उलथून पाडली गेली आणि त्या देशात कष्टकऱ्यांचे राज्य आले. सामुदायिक शेती, सामुदायिक निवास असे अनेक प्रयोग सोवियन रशियात केले गेले. त्यांचे कोण कौतुक झाले त्याकाळी परंतु त्या शोषितांच्या, कष्टकऱ्यांच्या हितरक्षणाची भाषा करणाऱ्या राज्यकर्त्यातूनच स्टॅलिनसारखा क्रूरकर्मा राज्यकर्ता तयार झाला आणि याच साम्यवाद नावाच्या देखाव्याने पुढे ब्रेझनेव्ह यांच्यासारख्या बेमुर्वतखोर आणि अकार्यक्षम राज्यकर्ता दिला. हा पोलादी पडदा उतरवण्याचे पुण्यकर्म केले हे मिखाइल गोर्बाचोव यांनी पण हाती आलेली सत्ता सांभाळणे त्यांना जमले नाही. आधी येल्तसिन आणि नंतर त्यांच्या आडून पुतिन यांनी सत्ता हस्तगत केली.

तेव्हा पुतिन हे या साम्यवादी राजकारणास लागलेले फळत आहे हे विसरून चालणार नाही. साम्यवाद आणि एकाधिकारशाही यांतील अंतर फार कमी असते. साम्यवादी म्हणवून घेणाऱ्यासर्वांनीच ते ओलांडले. पुतिन यांचे वेगळेपण असे की त्यांनी साम्यवादी सरकारातील समूहहुकूमशाही देखील मोडीत काढली आणि स्वत:ची पूर्ण एकाधिकारशाही स्थापित केली. साम्यवादी सरकारच्या काळात पोलिटब्यूरो नावाची एक व्यवस्था असे. यांतील बरेचसे होयबा तरी असत किंवा अध्यक्षाचे आव्हानवीर, पुतिन यांनी ही व्यवस्थाच दूर करून आव्हानाची शक्यताही दूर केली. तथापि हे करताना त्यांनी आपल्या साऱ्या कृतीस राष्ट्रवादाचा आकर्षक मुलामा दिला आणि रशियास पुन्हा महासत्ता बनवण्याची हाक देत सत्ता आपल्या हाती पूर्ण केंद्रीत राहील. याची पुरेपुर खबरदारी घेतली. तथापि एक महत्वाचा प्रश्न असा की जनतेनं त्यांना या साऱ्यात साथ कशी दिली ? त्याचे उत्तर आहे अर्थकारणात पुतिन यांच्या आधी दोन दशके रशियन अथव्यवस्था गाळात गेलेली होती आणि येल्तसिन यांच्या काळातील

भ्रष्टाचाराने तिला पुरते पोकळ केले होते. पुतिन यांनी आपल्या पहिल्या अध्यक्षीय काळात हे अर्थकारण चवसुधारले आणि सामान्य माणसाचे जीवन सुकर केले. त्यामुळे हा सामान्य माणूस त्यांच्याबाबत तटस्थ झाला.

आणि एरवीही दैनंदिन जगण्याच्या संघवर्षात व्यग्र असलेल्या सामान्य माणसासाठी वैचारिक, अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे मूल्य प्राणपणाने राखावे असे नसतेच. त्यांच्या मते या मूल्यांची गरज असते ती फक्त अभिजन आणि पत्रकार इत्यादीनाच ते नेहमीच मूठभर असतात तेव्हा काही थोडयांना जीवनावश्यक असलेल्या तत्वासाठी आपण का संघर्ष करावा असा त्याचा मुद्दा असतो आाि पुतिन यांच्यासारखे सत्ताधारी याचाच यशस्वी फायदा उठवतात. पुतिन यांच्या यशाने इतरांनाही त्याची प्रेरणा मिळते ही यातील खरी समस्या त्यामुळे उदारमतवाद या तत्वास कालबाहय ठरवून आपल्या साऱ्या समस्यांचे मूळ या विचारधारेत आहे असे सांगणाऱ्यांचे फावते.

१५. वैचारिक, अभिव्यक्ती स्वातंत्र्य हया मूल्यांची गरज कोणाला असते असे लेखकास वाटते ?

अ) अभिजन ब) पत्रकार क) सामान्य माणूस ड) यापैकी नाही

पर्यायी उत्तरे

१) फक्त अ आणि ब २) फक्त क ३) फक्त ड ४) फक्त अ, ब आणि क

---

१६. मुलाखतीत पुतिन यांनी कोणकोणते मुद्दे मांडले ?

अ) समलैंगिकतेस आपला आक्षेप नाही.

ब) रशियामधून उदारमतवाद कालबाहय झाला आहे.

क) उदारमतवादने सगळयांच देशात सांस्कृतिक संघर्ष निर्माण केला आहे.

ड) पारंपरिक मूल्ये ही अधिक स्थिर आहेत.

पर्यायी उत्तरे :

१) फक्त अ आणि क २) फक्त अ आणि ड ३) अ, ब, ड ४) अ, क, ड

---

१७. योग्य कथन / कथने ओळखा

अ) साम्यवाद आणि एकाधिकारशाही एकच असते.

ब) रशियामध्ये साम्यमवाद, समुहहुकुमशाही, एकाधिकारशाही पहायला मिळते.

क) कष्टकऱ्यांच्या राज्यातूनच रशियात साम्यवाद पुढे आला.

पर्यायी उत्तरे.

१) अ आणि ब २) अ आणि क ३) ब आणि क ४) वरीलपैकी सर्वच

---

१८. सामान्य माणूस पुतिन यांच्याबाबत तटस्थ का झाला ?

अ) पुतिन यांनी ढासळलेली अर्थव्यवस्था सुधारली.

ब) पुतिन यांनी अर्थकारण सुधारून सामान्य माणसांचे जीवन सोपे बनवले.

अयोग्य असणारे / री विधान/विधाने निवडा.

१) फक्त अ २) फक्त ब ३) दोन्हीही ४) यापैकी नाही

---

१९. खालीलपैकी कोणकोणत्या गोष्टींचा उल्लेख वरील उताऱ्यात आढळतो ?

अ) स्वातंत्र्य ब) गुलामगिरी क) समाजवाद ड) अभिव्यक्ती स्वातंत्र्य

इ) सामुदायिक शेती.

पर्याय

१) ब सोडून सर्व २) क सोडून सर्व ३) ड सोडून सर्व ४) इ सोडून सर्व

---

**प्र. क्रमांक २० ते २४ : खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या.**

गेल्या पंधरवडयात आपला देश बहात्तरावा स्वातंत्र्य दिन साजरा करण्याचा तयारीत असतानाच परकीय चलन बाजारात एक ऐतिहासिक घटना. ता. १४ ऑगस्ट रोजी रूपयांन अमेरिकी डॉलरच्या तुलनेत विनिमयदाराची सत्तरी पार केली. अमेरिकी डॉलरच्या तुलनेंत रूपयांच्या घसरणीला निमित्त झालं ते म्हणजे तुर्कस्तान या देशावर आलेलं आर्थिक आणि राजकीय संकट आता या तुर्कस्तानच्या आणि रूपयाच्या घसरणीचा काय संबंध, असा प्रश्न सर्वसामान्यांना पडणं साहजिक आहे. सुमारे आठ कोटी लोकसंख्या आलेला तुर्कस्तान हा देश सध्या महागाई आणि कर्जाच्या ओझ्याखालील दबलेला आहे. पुढच्या बारा महिन्यांत या देशाला सुमारे एकशे वीस अब्ज डॉलर इतकी कर्जाची परतफेड करायची आहे. त्यापैकी सत्तर अब्ज डॉलरची रक्कम विविध बँकांना परत करायची आहे. महागाई वाढली असतानाही तुर्कस्तानच्या सरकारनं व्याजाचे दर वाढवलेले नाहीत. दर वाढवण्यासाठी घेणेकरी संस्था तुर्कस्थानावर दबाव आणत आहेत. त्यातचं अमेरिकेनं तुर्कस्तानमधून आयात होणाऱ्या पोलाद आणि ॲल्युमिनियमवरचा आयातकर दुप्पट केल्यानं तुर्कस्तानच्या संटात भर पडली. शिवाय तुर्कस्ताननं एका अमेरिकी धर्मगुरूला हेरगिरीच्या आरोपाखाली गेल्या दोन वर्षापासुन तुरूंगात डांबून ठेवलं आहे. त्याच्या सुटकेसाठी अमेरिका तुर्कस्तानवर राजकीय दबाव आणत आहे. या सगळया गोष्टीची परिणाम होऊन तुर्कस्तानचं 'लिरा' हे चलन गेल्या वर्षभरात अमेरिकी डॉलरच्या तुलनेत सुमारे चाळीस टक्क्यांनी घसरलं. त्यापैकी २८ टक्के घसरण एकटया ऑगस्ट महिन्यात झाली. तुर्कस्तान एवढं मोठं कर्ज एवढया अल्पावधीत परत करू शकेल का, याबाबत साशंकता निर्माण झाल्यानं जागतिक बाजारात अस्थिरता पसरली तुर्कस्तान हा एक विकसनशील देश असल्याने त्याच्याबद्दलच्या साशंकतेची लागण भारतासारख्या इतर विकसनशील देशांच्या चलनांनासुद्धा झाली आणि आपल्या रूपयाची मोठी घसरण झाली.

कोठल्याही देशात गुंतवणूक करताना परकीय गुंतवणूकदार त्या देशातली व्याजाचे दर आणि चलनाचे विनिमयदर विचारात येऊन एकूण परतावा किती मिळेल, याचा अंदाज बांधतात.

२०. रूपयाच्या घसरणीमागील कारणे कोणती?

अ) तुर्कस्तानवरील आर्थिक संकट ब) तुर्कस्तानवरील ऐतिहासिक संकट

क) तुर्कस्तानवरील राजकीय संकट

पर्याय

१) अ आणि ब २) अ आणि क ३) क आणि ब ४) अ, ब आणि क

२१. लेखकाच्या मते .....

अ) तुर्कस्तानमधील परिस्थितीचा रूपयाच्या घसरणीशी काहीही संबंध नाही.

ब) लोकसंख्या वाढीमुळे तुर्कस्तान महागाई आणि कर्जाच्या ओझ्याखाली दबलेला आहे.

पर्याय

१) अ चूक, ब बरोबर २) ब चूक, अ बरोबर ३) दोन्ही चूक ४) दोन्ही बरोबर

२२. वरील उताऱ्यावरून खालील निष्कर्ष काढता येतो.

१) व्याजदर वाढवले तर तुर्कस्तान महागाईच्या संकटातून बाहेर पडेल.

२) अमेरिकेने पोलाद व ॲल्युमिनीयमवरील आयातकर कमी केल्यास तुर्कस्तान पूर्णपणे संकटातून बाहेर पडेल.

३) 'लिरा' अमेरिकी डॉलरच्या तुलनेत गेल्या वर्षभरात २/५ पटीने घसरले आहे.

४) वरीलपैकी एकही नाही.

२३. खालील विधाने अभ्यासा.

अ) अमेरिकेनं तुर्कस्तानमधून आयात होणाऱ्या पोलाद आणि ॲल्युमिनियमवरचा आयातकर दुप्पट केल्यानं तुर्कस्तानच्या संकटात भर पडली.

ब) तुर्कस्ताननं एका अमेरिकी धर्मगुरूला दोन वर्षापासून तुरूंगात डांबून ठेवलं आहे.

पर्याय

१) अ व ब बरोबर, विधान ब, विधान अ ची कारणमीमांसा देते

२) अ व ब बरोबर, विधान ब, विधान अ ची कारणमीमांसा देत नाही.

३) फक्त अ बरोबर

४) फक्त ब बरोबर

२४. परकीय गुंतवणूकदार गुंतवणूक करताना कोणत्या घटकांवर विशेष भर देतो ?

अ) देशातील व्याजाचे दर ब) चलनाचा विनिमय दर

क) वस्तूंवरील आयातकर ड) एकूण परताव्याचा अंदाज

पर्याय

१) अ, ब, व क २) ब, क व ड ३) अ व ब ४) अ, ब व ड

**प्र. क्रमांक २५ ते २८ : खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या.**

शहरी वातावरणात वाढणाऱ्या मुला–मुलींसमोर फार मोठया समस्या 'आ' वासून उभ्या आहेत. या समस्येचं मूळ आहे सुखवस्तूपणात. गावाकडची साध्या कुटुंबातली मुलं–मुली चार–पाच किलोमीटर चालन शाळेला जाताना मी बघितलं आहे. शहरातल्या मुलांना पालक स्वत: सोडतात किंवा वाहनाची सोय करतात. गावाकडची मुलं शाळेत अगोदर जाऊन आणि नंतर थांबून सहजी खेळाचा आनंद घेतात. शहरातली मुलं घंटा वाजताना शाळेत प्रवेश करतात आणि शाळा संपल्यावर लगेच त्यांना त्यायला आलेल्या वाहनात बसून घरच्या प्रवासाला लागतात. ही वाहनं मुलांनी इतकी खचाखच भरलेली असतात, की हालचाल करायला तर सोडा श्वास घ्यायलाही जागा नसते.

गावाकडची मुलं दणादण उडया मारतात. शहरातल्या मुलांना जिन्याच्या दोन पायऱ्या सोडून उडी मारायला पालक 'नको रे राजा लागेल तुला' म्हणत मुरड घालतात. गावाकडच्या मुलांना खेळताना लागल, खरवाटलं तर ती सहजी सहन करतात. घरगुती उपाय करून पुढं सरकतात. शहरातल्या मुलांना खेळताना चुकून लागलं, तर त्यांच्या आया 'कोणामुळे माझ्या बंडूला लागलं' हे विचारत भांडायला येतात. गावाकडच्या मुलांना पालक एकच वेळी दहा गोष्टी करायला लावत नाहीत. शहरातले काही पालक आपल्या पूर्ण न झालेल्या अपेक्षा मुलांकडून पूर्ण करून घ्यायला वेडा अट्टाहास करतात. मग असे पालक मुलांना एकाच वेळी खूप अभ्यास करून घ्यायला शाळा सोडून क्लास लावतात आणि त्याबरोबर तबला, पियानोपासून ते चित्रकला, गायन, यांचेही क्लास लावतात. असे पालक मुलांना काय आवडतं आहे, याचा विार करतच नाहीत. फक्त आपले विचार लादतात.

याच सर्वात घालक गोष्ट अशी आहे, की शहरातले बरेच पालक मुलांकरता इतकं काही करायला जातात, की त्यांना कोणत्याही संकटाचा सामनाच करायला लागणार नाही, याकरता धडपडतात. वाढत्या वयात संकटांना समस्यांना समोरं जायला लागलं नाही, तर त्या मुला–मुलींचं व्यक्तिमत्व घडणार तरी कसं ? कारण संकटातून मार्ग काढण्याची कला त्यांना शिकवणार कोण ? दडपणात सर्वोत्तम कामगिरी करून दाखवायचं कसब त्यांच्यात येणार कस ? स्वत:च्याच यशात मनस्वी आनंद न मानणारे हे लोक मग दुसऱ्याच्या यशात आनंद मानायला शिवणार कसे ?

वर मांडलेल्या जटिल समस्यांवर मार्ग दाखवणारे उपाय क्रीडाविश्वात आहेत. जगातल्या अस्थिरतेच्या वातावरणात 'जगा आणि जगू द्या' ही घोषणा जशी सर्वश्रुत झाली, तशीच आधुनिक धकाधकीच्या वातावरणात मन रमवायला, निरोगी रहायला, 'सांघिक' म्हणून बनायला 'खेळा व खेळू द्या' ही घोषणा गरजेच झाली आहे.

२५. पुढील दोन विधानांपैकी कोणते / ती विधान / ने अयोग्य नाहीत ?

अ) गावाकडील सर्व मुलं – मुली चार–पाच किलोमीटर चालत शाळेला जातात.

ब) शहरातील मुले शाळेत कुठलेही खेळ खळत नाहीत.

पर्याय

१) फक्त अ २) फक्त ब ३) दोन्ही अ व ब ४) दोन्ही अयोग्य

---

२६. दिलेल्या परिच्छेदाच्या संदर्भातील सर्वात तर्कसंगत भाष्य निवडा.

१) गावातील पालक हे शहरातील पालकांपेक्षा जास्त समंजस असतात.

२) शहरातील पालक आपल्या पाल्यांवर अधिक प्रेम करतात.

३) गावाकडची मुलं शहरातील मुलांपेक्षा जास्त कणखर असतात.

४) आपल्या अपूर्ण अपेक्षा मुलांकडून पूर्ण करून घेण्यासाठी शहरातील काही पालक मुलांवर अधिक बंधने टाकतात.

---

२७. सध्याच्या वातावरणात 'खेळा आणि खेळू द्या' ही घोषणा गरजेची झाली आहे करण .....

१) मन रमवायला २) निरोगी राहायला ३) 'सांधिक' माणूस बनायला ४) वरीलपैकी सर्व

---

२८. परिच्छेद योग्य ते शिर्षक सुचवा.

१) सुखवस्तूपणाचा तोटा २) पालकांची बदलती मनोभूमिका

३) शहरी व ग्रामीण जीवनातील फरक ४) गरज व्यक्तिमत्व विकासाची

---

**प्र. क्रमांक २९ ते ३३ : खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या.**

जागतिक स्तारावर माणसांचे स्थलांतर कित्येक शतकांपासून सुरू आहे. माणसं समूहाने एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशाकडे वेगवेगळया कारणांमुळे जाऊ लागली. गायरान जमीन किंवा लागवडीसाठी योग्य असणाऱ्या जमिनींच्या शोधासाठी. जुलमी राजवटींपासून किंवा छळांपासून मुक्त होण्यासाठी विचार आणि अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्यासाठी, किंवा वारंवार भटकण्याच्या तीव्र इच्छेपोटी. परक्या प्रदेशातून आलेल्या माणसांनी आपल्या सामानाप्रमाणे त्यांची संस्कृतीही आणली आणि त्यावर ताबा ठेऊन ती प्रवासात जतन करण्याचा किंवा त्याबाबत तडजोड करण्याचा प्रयत्न केला. ते इतर जमातीत मिसळून गेले. त्या दिशेने त्यांनी युद्ध किंवा व्यापार किंवा विवाहविधी किंवा सर्व सामान्य उपक्रमांमधून संघर्ष केला. सुरूवातीला संघर्षामुळे काही काळ तणावात गेला, नंतर यथावकाश त्यांनी वर्चस्व प्रस्थापित केले. आणि कला व विशेष कौशल्याच्या माध्यमातून शांतपणे भरभराट केली. आदान–प्रदानातून नातेसंबंध निर्माण झाले. मोकळया वातावरणात कोणत्याही सांस्कृतिक–सामाजिक वर्चस्वाशिवाय प्रत्येक समूह बहुजिनसी समाजात विकसित होत गेला. म्हणून मंगोलीयन लोक अलास्कापर्यंत गेले. कोलबंसने युरापातील नव्या राष्ट्राचे जागतिक स्वरूपाचे धाडसी नेतृत्व केले. नंतर वसाहतीकरण झाले. अन्य देशांना आणि संस्कृतिचे हे उहाहरण म्हणता येईल. प्रत्येक समूह वडिलोपार्जित गोष्टी आंतरिक प्रेरणेतून टिकवून ठेवत असतो. जुन्या घराविषयी कधी काळी वाटणारी ओढ एका किंवा दुसऱ्या पिढीनंतर कमी होत जाते. नंतरच्या शतकात कदाचित एखादा वेगळे धाडस करण्याचे सामर्थ्य दाखवू शकतो. लोकांना जुन्या जिव्हाळयासंबंधी शोध घेणं अवघड होतं. तुम्ही तिथं ज्यावेळी राहता तो भूभाग तुमचा होऊन जातो. तुम्ही नव्या प्रदेशातील रंग – गंधामध्ये मिसळून जाता. स्थानिक गोष्टी व्यापक अवकाशात सामावून जातात. काही थोडेच लोक असे असतात, की हे आपली जुनी ओळख टिकवून ठेवतात तोवर संयोगवश एखादी पिढी आपल्या संवेदनशीलतेतून मुक्त होऊन, हरवलेल्या स्वत्वाची काळजी घेण्याच्या पलीकडे पाहू शकते. कोणतीही स्त्री अथवा पुरूष अथवा संस्कृती जास्त काळ एकटे राहू शकत नाही. केंद्रवर्ती आणि अपकेंद्री झोत काही काळ कार्यरत राहतो. स्वतंत्र नागरिकत्वाच्या येऊ घातलेल्या अस्तित्वासाठी असंख्य पिढया प्रार्थना करतात. बाहेरच्या सगळया परिणामांना उघड विरोध करून आपली मोहर उमटवतात. तथापि आपल्याला हे चांगल्या प्रकारे ठाऊक आहे की आपण आत्यंतिक संवेदशील आहेत. स्वेच्छेने प्रतिसाद आणि प्रतिक्रिया देण्यामुळे आम्ही कधी स्वतंत्र असतो तर कधी आश्रित असतो. जीन्स, डी. एन. ए. आणि आर. एन.ए. आधीच जोडले गेलेले असतात. यापूर्वी काय घडून गेलंय हे प्रत्येक मज्जातंतूला स्मरत असतं. दुसरे लोक काय विचार करतात, काय म्हणतात आणि काय करतात हे शरीर, मन आणि स्वत:चं आध्यात्म ग्रहण करीत असतं अज्ञानामुळे भय जन्माला येतं. भय द्वेष निर्माण करतं. द्वेष आत्मविश्वासाला नष्ट करतो. आणि हे सगळं आम्हाला मृत्यूकडे घेऊन जातं, अनेक प्राचीन संस्कृती या प्रकारे मिसळून दीर्घकालीन भूतकाळात लयास गेल्या. एखाद्याला तर धरून राहण्यासाठी दुसऱ्यामध्ये सामावून जावे लागते. नाहीतर दुसरेही नामशेष होतात.

२९. माणसं पुढीलपैकी कोणत्या कारणांसाठी स्थलांतर करतात?

अ) लागवडीयोग्य जमिनींच्या शोधासाठी ब) जुलमी राजवटींपासून मुक्त होण्यासाठी

क) उत्तम शिक्षण व रोजगारासाठी ड) वारंवार भटकण्याच्या इच्छेपोटी

पर्याय

(१) अ व ब (२) अ, ब व ड (३) ब, क व ड (४) अ, ब व क

---

३०. परक्या प्रदेशातील माणसे कशाप्रकारे इतर स्थानिक लोकांमध्ये मिसळून गेली ?

अ) आदान – प्रदानातून नातेसंबंध निर्माण करून

ब) आपली संस्कृती जतन करून तसेच तडजोड करून

क) कला व विशेष कौशल्याच्या माध्यमातून

पर्याय

(१) अ व ब (२) फक्त ब (३) अ व क (४) अ, ब व क

३१. प्रत्येक समुह वडिलोपार्जित गोष्टी ..... मुळे टिकवून ठेवत असतो.

(१) जुन्या घराविषयी वाटणारी ओढ
(२) आंतरिक प्रेरणेमुळे
(३) वारसाहक्कामुळे
(४) जुनी ओळख टिकवण्याच्या इच्छेमुळे

३२. लेखकाच्या मते, आम्हाला मृत्युकडे घेऊन जाणारे मुळ कारण कोणते ?

(१) आत्मविश्वासाचा अभाव (२) भय (३) द्वेष (४) अज्ञान

३३. आम्ही कधी स्वतंत्र असतो तर कधी आश्रित असतो, असे लेखक का म्हणतो ?

(१) जीन्स, डी.एन.ए. आणि आर.एन.ए. आधीच जोडलेले असल्यामुळे
(२) दुसरे लोक काय विचार करतात, काय म्हणतात हयाचा सतत विचार केल्यामुळे
(३) स्वेच्छेने प्रतिसाद आणि प्रतिक्रिया देण्यामुळे
(४) वरीलपैकी एकही नाही.

